राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत व भविष्यातही अशा सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही, अशा प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनी हस्तांतरण व्यवहारावरील असलेले निर्बंध उठविण्याची कार्यवाही करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.आरपीए-२०१९/प्र.क्र १५१/र-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : ५ ऑगस्ट, २०१९.

<u>वाचा</u>:- महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६,१९८६,१९९९ अन्वये प्रसिध्द केलेल्या अधिसूचना

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६,१९८६,१९९९ अन्वये प्रसिध्द केलेल्या अधिसूचनांनुसार पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींच्या ७/१२ उता-या मधील इतर हक्कातील नोंदीमध्ये “पुनर्वसनासाठी राखीव” असे शेरे नमूद करुन हस्तांतरण व्यवहारावर निर्बंध लादण्यात आले आहेत. त्यामुळे सदर प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील भुधारकांना मागील २० ते ३५ वर्षापासून त्यांच्या जमिनी विक्री, खातेफोड आणि वारसाहक्कानुसार विभागणी करण्यास अडचणी येत आहेत.

प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी लाभक्षेत्रामध्ये जमिनीची आवश्यकता विचारात घेता,लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र जमिनीवर असलेले निर्बंध उठविण्यास परवानगी देणे शक्य नाही. त्यामुळे लाभक्षेत्रातील खातेदारांनी त्यांच्या स्लॅबपात्र क्षेत्रावरील निर्बंध उठविण्यासाठी मा.उच्च न्यायालयात अनेक रिट याचिकाही दाखल केल्या आहेत. सदर याचिकेच्या अनुषंगाने निर्बंध उठविण्याबाबत सर्वंकष धोरण निश्चित करण्याचे निर्देश मा. उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यास अनुसरुन कार्यवाही करणे आवश्यक आहे. राज्यातील ज्या पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रांमधील खातेदारांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत व भविष्यातही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही, याबाबत प्रकल्प यंत्रणेने खात्री करुन त्याबाबत सादर केलेल्या तांत्रिक अहवालाचे आधारे, सदर लाभक्षेत्रातील भूधारकांच्या जमिनीच्या ७/१२ मधील इतर हक्कातील नोंदीमध्ये पुनर्वसनासाठी राखीव असलेले शेरे कमी करण्याबाबतची व जमिनी हस्तांतरण व्यवहारावर निर्बंध उठविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६,१९८६,१९९९ अन्वये प्रसिध्द केलेल्या विषयांकित अधिसूचनानुसार राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनी हस्तांतरण निर्बंध लादण्यात आले आहेत. राज्यातील ज्या पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील खातेदारांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत व भविष्यातही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही, अशा लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र जमिनीच्या ७/१२ उता-या मधील इतर हक्कातील

नोंदीमध्ये *"पुनर्वसनासाठी राखीव"* असे नोंदविण्यात आलेले शेरे उठविण्याबाबतची कार्यवाही खालील दिलेल्या कार्यपध्द्तीने करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

लाभक्षेत्रातील निर्बंध उठविण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली **"पुनर्वसनासाठी राखीव म्हणुन ७/१२ उता-यामध्ये नोंदविलेले निर्बंध उठविण्याबाबत आढावा समिती"** स्थापन करण्यात येत आहे.

सदर समितीची रचना खालील प्रमाणे असेल-

१) जिल्हाधिकारी : अध्यक्ष
२) मुख्य अभियंता (जलसंपदा) : सदस्य
३) उप आयुक्त (पुनर्वसन) : सदस्य
४) संबंधित पाटबंधारे प्रकल्पाचे काम पाहणारे अधिक्षक अभियंता : सदस्य
५) उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन) : सदस्य सचिव

कार्यकक्षा :- जिल्ह्यातील पुनर्वसन अधिनियमानुसार अधिसुचित झालेल्या पाटबंधारे प्रकल्पांतर्गत लाभक्षेत्रांमध्ये सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत व भविष्यातही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही अशा लाभक्षेत्रांमधील स्लॅबपात्र जमिनींच्या ७/१२ उता-या मधील इतर हक्कातील नोंदीमध्ये पुनर्वसनासाठी राखीव म्हणून नोंदविण्यात आलेले शेरे उठविण्याबाबत साकल्याने व सर्वंकष आढावा घेऊन असे शेरे/निर्बंध उठविण्याबाबत सविस्तर अहवाल व त्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही करील.

कार्यपध्दती :- १. :- ज्या पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र जमिनींच्या इतर हक्कातील नोंदमध्ये पुनर्वसनासाठी राखीव म्हणुन नोंदविण्यात आलेले शेरे/ जमिनिच्या हस्तांतरण व्यवहारांवरील निर्बंध उठविणे आवश्यक आहे, अशा सर्व प्रकरणांचा समिती आढावा घेऊन समितीच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह विहीत विवरणपत्रामध्ये प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करील. त्याबाबतचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:-

जिल्हा तालुक्याचे नाव

अनुक्रमांक	गावांचे नाव	बंदी ठेवण्यात आलेले गट नं	लाभक्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध असलेली गट नं	लाभक्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध नाहीत व भविष्यातही उपलब्ध होण्याची शक्यता नाही,असे गट नं	संक्षिप्त अभिप्राय
१	२	३	४	५	६

२. जिल्ह्यातील पुनर्वसन अधिनियमानुसार अधिसूचित झालेल्या पाटबंधारे प्रकल्पांतर्गत लाभक्षेत्रांमध्ये सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत व भविष्यातही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही, असा अहवाल संबंधित पाटबंधारे प्रकल्पाच्या प्रकल्प यंत्रणेकडुन मागविणे व सदर अहवालाचे आधारे लाभक्षेत्रांमधील स्लॅबपात्र जमिनींच्या ७/१२ मधील इतर हक्कातील नोंदीमध्ये पुनर्वसनासाठी राखीव असलेले शेरे कमी करण्याबाबतचे प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर, जिल्हाधिकारी त्याबाबतची पुढील कार्यवाही करतील.

३. प्रकल्पनिहाय समितीची मासिक बैठक घेण्यात यावी

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे. त्याचा संकेतांक २०१९०८०५१५३७०७४२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

Shahajahan Shakur Mulani

Digitally signed by Shahajahan Shakur Mulani
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fe995676d2b60024012af0b1df31396dfbfe33f49b4cd9f6c29a75466c24c0d, cn=Shahajahan Shakur Mulani
Date: 2019.08.05 15:43:17 +05'30'

(शहाजहान. श. मुलाणी)
अवर सचिव, महसुल व वन विभाग

प्रति,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. राज्यमंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) सचिव (आपत्ती व्यवस्थापन ,मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
६) सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई ,
८) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर,
९) सर्व विभागीय आयुक्त,
१०) सर्व जिल्हाधिकारी,
११) सर्व अतिरिक्त जिल्हाधिकारी (पुनर्वसन),
१२) सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
१३) सर्व कार्यासने (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४) निवड नस्ती, कार्यासन र-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.